मुंबई विद्यापीठ

क्रं. घ.म./ ३७ / २०१२ - २०१३

परिपत्रक :-

संदर्भ - १) विद्यापीठ परिपत्रक क्रमांक CONCOL/48, दिनांक ३१ जानेवारी २००९ पहावे.
२) विद्यापीठ परिपत्रक क्रमांक घ.म./७३/२०१० दिनांक १६ एप्रिल, २०१० पहावे.
३) विद्यापीठ परिपत्रक क्रमांक घ.म./५५/२०११ दिनांक १० मार्च, २०११ पहावे.
४) विद्यापीठ परिपत्रक क्रमांक घ.म./९५/२०११ दिनांक ३० मे, २०११ पहावे.
५) विद्यापीठ परिपत्रक क्रमांक घ.म./३७७/२०११ दिनांक ८ नोव्हेंबर २०११ पहावे.
६) विद्यापीठ परिपत्रक क्रमांक घ.म./०१/२०१२ दिनांक २१ जानेवारी, २०१२ पहावे.
७) विद्यापीठ परिपत्रक क्रमांक घ.म./१२/२०१२ दिनांक २८ मे, २०१२ पहावे.

वाचावे - १. मा. उच्च न्यायालयाने याचिका क्र. २२१६/२००६ मध्ये दिनांक ३-१२-२००८ रोजी दिलेले आदेश.
२. मा. सर्वोच्च न्यायालयाने एसएलपी क्र. १३९४४/२००९ मध्ये दिनांक २९/५/२००९ रोजी दिलेले आदेश.
३. शासन परिपत्रक क्र. एनजीसी - २००८/(३७९/०८)/ मशि - ३, दि. ७ मार्च, २००९.

सर्व संलग्नित महाविद्यलयीन संस्थाचे अध्यक्ष / सचिव / प्राचार्य यांचे लक्ष वेधण्यात येते की, श्री. रा.गो. जाधव उपसचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांनी निर्गमित केलेले शासन निर्णय क्र. संकीर्ण २००९(४३५/०९) विशि - ३, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२, दिनांक ३० जानेवारी २०१० रोजीचे पत्र, मा. उच्च न्यायालयाने याचिका क्र. २२१६/२००६ मध्ये दिलेल्या आदेशानुसार विद्यापीठाशी संलग्नित अशासकीय अनुदानित / विनाअनुदानित / कायम विना अनुदानित महाविद्यालयातील प्राचार्य व अधिव्याख्यातांची सर्व रिक्त पदे दिनांक ३१/५/२०१० पूर्वी विद्यापीठ अनुदान आयोग / आखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद / राष्ट्रीय अध्यापक शिक्षक परिषद इ. प्राधिकरणांनी विहीत केलेल्या विनियमनानुसार अर्हताधारक, मान्यताप्राप्त आणि नियमित स्वरूपाच्या तत्वावर भरणे अनिवार्य होते. परंतु विद्यापीठाच्या असे निदर्शनास आले आहे की, काही महाविद्यालयांमध्ये उपरोक्त आदेशाचे पालन केल्याचे दिसून येत नाही.

वरील आदेशाप्रमाणे सर्व महाविद्यालयांनी / संस्थांनी दिनांक ३१.५.२०१० पुर्वी प्राचार्य व अधिव्याख्यातांची रिक्त पदे भरली नसतील तर संबंधित महाविद्यालयाविरूध्द मा. उच्च न्यायालयाने याचिका क्र. २२१६/२००६, मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारवाई करण्यात येईल, असे सर्व महाविद्यालयांना परिपत्रकाद्वारे सातत्याने कळवूनसुध्दा काही महाविद्यालयांनी याबाबतची प्रक्रिया अजूनही पूर्ण केलेली नाही. प्राचार्य व अध्यापकांच्या नियमित नेमणूका महाविद्यालय स्तरावर केलेल्या नसल्याबाबत विधानसभेच्या हिवाळी अधिवेशनात याबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आलेला आहे.

त्यामुळे मा. कुलगुरू यांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे संस्थांचे अध्यक्ष / सचिव / प्राचार्य यांना विनंती करण्यात येते की, वरिल परिस्थितीचे गांभिर्य लक्षात घेऊन तात्काळ रिक्त पदे भरावीत व त्याप्रमाणे अहवाल सोबत जोडलेल्या प्रपत्रात भरून विद्यापीठास सादर करावा.

..२/-

सदरबाबत महाविद्यालय स्तरावर पुढील ३ महिन्यात योग्य ती कार्यवाही करून व त्याचा अहवाल विद्यापीठास पाठवावा. सदर अहवाल ३ महिन्यात प्राप्त न झाल्यास महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ९१(१) अन्वये महाविद्यालयांची संलग्नता रद्द करणेबाबत कारवाई करण्यात येईल व त्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील याची कृपया नोंद घ्यावी.

मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- २२ फेब्रुवारी, २०१३

कुलसचिव

प्रति,

प्रत, सर्व संलग्नित महाविद्यालयीन संस्थाचे अध्यक्ष / सचिव / प्राचार्य यांना माहीतीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

प्रत माहीतीसाठी रवाना :-

१. मा. उपसचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
२. मा. संचालक, उच्च शिक्षण,महाराष्ट्र राज्य, पुणे - ४११ ००१.
३. सह संचालक, मुंबई विभाग, मुंबई - ४०० ००१.
४. संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई - ४०० ०३२.
५. कुलगुरूंचे कार्यकारी सचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई - ४०० ०३२.
६. स्वीय सहायक, प्र-कुलगुरू, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई - ४०० ०३२.
७. स्वीय सहायक, कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई - ४०० ०३२.
८. अभिलेखा विभाग (रेकॉर्ड सेक्शन) (१० प्रती).

कुलसचिव

प्रपत्र अ - अनुदानित / कायम विनाअनुदानित महाविद्यालयांतील **प्राचार्यांची** माहिती

| अनुदानित / विनाअनुदानित | महाविद्यालयाचे नाव, पत्ता, दुरध्वनी कमांक व ईमेल. | विद्याशाखा | मान्यता प्राप्त कार्यरत प्राचार्यांचे / प्र-प्राचार्यांचे नाव, नेमणूकीची तारीख व भ्रमणध्वनी कमांक | प्राचार्य पद रिक्त असल्यास कोणत्या तारखेपासून रिक्त आहे | प्राचार्य पद रिक्त रहाण्याचे कारण | प्राचार्य पद भरण्याबाबत केलेली कार्यवाही |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | |

प्रपत्र ब - अनुदानित / कायम विनाअनुदानित महाविद्यालयांतील **शिक्षकांची** माहिती

| अनुदानित / विनाअनुदानित | महाविद्यालयाचे नाव | विषय | संवर्गानुसार मंजूर पदे | पद / पदे कोणत्या तारखेपासून रिक्त आहे | पद रिक्त रहाण्याचे कारण | पदे भरण्याबाबत केलेली कार्यवाही |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | |